## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र.६१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०१/२०१७

**१) गैरकायदयाची मंडळी जमवुन हत्यार,तलवार,लाठया काढुन घरावर दगडफेक केली व जिवाने मारण्याची धमकी दिली. :–**

दिनांक २३/०१/२०१७ चे २०.०० रा दरम्यान यातील फिर्यादी आपल्या घरी हजर असतांना यातील पाचही आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी तयार करुन हत्यार तलवार लाठया दगड घेवुन फिर्यादीचे घरा समोर जावुन रोडा वरुन घरावर दगडफेक करुन तसेच घराचे मुख्य दरवाज्याला तोडुन शिवीगाळ व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १४३,१४७,१४८,१४९,३३६,४५२,५०४,५०६ भादवी. सहकलम ४/२५ आर्म अॅक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. रायपुरे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) चारचाकी गाडीची एसटी बसला धडक लागुन बसचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद . : –**

दिनांक २४/०१/२०१७ चे १२.४० वा. दरम्यान फिर्यादी आसीफ अजीज शेख वय ५४ वर्ष, रा. एसटी चालक साकोली हा आपल्या ताब्यातील एसटी बस ही महालगाव सुकडी कडुन असतांना कुंभली गावाजवळ यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील काळीपिवळी गाडी हयगयीने व लापरवाहीने चालवुन एसटी बस ला मागेहुन धर्मापुरी/कुंभली येथे धडक देवुन एसटी बस चे अंदाजे १०,०००/–रु. चे नुकसान केल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,४२७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) महीलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . : –**

दिनांक २१/०१/२०१७ चे १८.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही तीचे घरुन कामावर जात असतांना यातील आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटार सायकलने पाठलाग केला व त्याबाबत फिर्यादीने नाव विचारले असता आरोपीने फिर्यादीचा मोबाईल नंबर मागुन तिची ईच्छा नसतांना फिर्यादीशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करुन विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४(ड)(२) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. शिंदे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) सार्वजनीक ठिकानी वाहन उभे ठेवुन रहदारीस अडथडा निर्माण झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २४/०१/२०१७ चे १५.०० वा. दरम्यान. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील कमांडर जीप वाहन दवाखाना चौक गोबरवाही येथे सार्वजनीक रस्त्यावर जानाऱ्या येणाऱ्या लोंकाना रहदारीस अडथळा निर्माण होवुन धोका निर्माण होईल अशा स्थितीत कमांडर जीप क्र. एमएच ३५ ई ००२१ चा चालकाने उभे करून मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. इंगोले पो.स्टे. गोबरवाही यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोना. इंगोले पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक २४/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ९२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती १० केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.